आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

१३ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी ज्येष्ठ नागरिकांना दिलं जाणार नवीन कार्ड, लवकरच सुरू होणार नोंदणी प्रक्रिया

- सीबीआयच्या प्रकरणातही दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

- गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेले भाविक परतीच्या वाटेवर असल्यानं मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा

**आणि**

- भेसळयुक्त खाद्यपदार्थांची निर्मिती आणि विक्रीवर निर्बंध लादण्याचे FSSAI चे राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश

**<><><><><>**

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र असणाऱ्या सर्व जेष्ठ नागरिकांना एक नवीन विशेष कार्ड दिलं जाणार आहे. आधार कार्डावरच्या जन्मतारखेनुसार ७० वर्ष आणि त्याहून अधिक वयाचे नागरिक या योजनेत अर्ज दाखल करण्यास पात्र असतील. ही योजना एका आठवड्यात सुरु होईल अशी अपेक्षा असून यासाठी पात्र व्यक्तींनी वेबसाइटवर अर्ज भरणं आवश्यक आहे. पोर्टलवर फेस ऑथेंटिकेशनची सुविधा उपलब्ध असून ७० वर्षांवरच्या नागरिकांसाठी विशिष्ट लिंक उपलब्ध आहे. खाजगी विमाधारक आणि कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे लाभार्थी देखील या योजनेचा लाभ घेऊ शकतील अशी

माहिती सूत्रांनी दिली आहे. मंत्रिमंडळानं याच आठवड्यात आयुष्मान भारत योजने अंतर्गत मिळकतीच्या कोणत्याही सीमेशिवाय जेष्ठ नागरिकांच्या या योजनेला मंजुरी दिली आहे.

<><><><><>

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयच्या प्रकरणात जामीन मंजूर केला आहे. ईडी अर्थात सक्त वसुली संचलनालयाच्या प्रकरणात त्यांना यापूर्वीच जामीन मिळाला आहे. ईडीनं त्यांना २१ मार्च रोजी अटक केली होती. त्यानंतर कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी भ्रष्टाचार झाल्याची तक्रार सीबीआयनं त्यांच्याविरोधात दाखल केली आणि २६ जून रोजी अटक केली होती. याप्रकरणी १० लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर त्यांना जामीन मिळाला. या प्रकरणावर केजरीवाल यांनी कुठलेही जाहीर वक्तव्य करू नये, विशेष न्यायालयात सर्व सुनावण्यांना हजर रहावं, अशी अट सर्वोच्च न्यायालयानं घालून दिली आहे.

ईडीच्या प्रकरणात मिळालेल्या जामीनाला स्थगिती देण्यासाठीच सीबीआयनं अटक केली होती हे स्पष्ट झाल्याची प्रतिक्रिया या जामीनानंतर आम आदमी पार्टीनं दिली आहे. केजरीवाल यांना मिळालेल्या जामीनातून देशात लोकशाहीचा पाया आजही भक्कम असल्याची बाब स्पष्ट झाली असल्याची भावना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. अटक अवैध असल्याचा केजरीवाल यांचा दावा सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावल्याची प्रतिक्रिया भाजपानं दिली आहे.

<><><><><>

चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाला उद्यापासून आरंभ होत असून नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित या हीरक महोत्सवी विशेष सोहळ्याचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी एक विशेष टपाल तिकिट आणि नाणं जारी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात केंद्रीय गृह मंत्रालयाअंतर्गत असलेल्या राजभाषा विभागांतर्गत भारतीय भाषा विभागाचं उद्घाटन तसंच अनेक पुस्तकं आणि मासिकांचं प्रकाशन करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी जिल्हा नियोजन विकास आराखड्याच्या २५० कोटी रुपयांच्या विकास कामांना मंजुरी दिली आहे. या निधीतून सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या सर्व १ हजार ३३३ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे लवकरच या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाऊन मुलांच्या सुरक्षिततेत वाढ होईल, अशी अपेक्षा आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी आज नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांना एका सादरीकरणाद्वारे महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक कार्याची आणि सफाई कर्मचाऱ्यांसाठीच्या सोयीसुविधांची माहिती पालिका आयुक्तांनी दिली. डॉ.वावा यांनी महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक विविध वाहनांची आणि यंत्रसामुग्रीची प्रत्यक्ष पाहणी केली तसंच सफाईमित्रांशी संवाद साधला. इतर शहरांच्या तुलनेत नवी मुंबई महानगरपालिकेचं काम पुढारलेलं असून स्वच्छता कामगारांच्या सुरक्षेची

आणि आरोग्याची विशेष काळजी घेतली जात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**<><><><>**

ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट या ई कॉमर्स कंपन्या काही निवडक कंपन्यांना पसंती देऊन गैर स्पर्धात्मक पद्धतींचा अवलंब करत असल्याचं भारतीय स्पर्धा आयोगाच्या निदर्शनाला आलं आहे. आयोगानं एका अहवालात या तपासाबद्दल माहिती दिली आहे.  या दोन्ही कंपन्यांनी काही निवडक कंपन्यांनाच उच्च मानांकन दिलं असून ग्राहक एखादी वस्तू ऑनलाईन सर्च करत असताना त्यांना या कंपन्यांना जास्त पसंती असल्याचं दिसून येतं. यामुळे इतर कंपन्यांची उत्पादनं या स्पर्धेत मागे पडतात, असं या अहवालात म्हटलं आहे. या दोन्ही कंपन्या सध्या या अहवालाचा अभ्यास करत असून त्यानंतर आयोगासमोर आपली बाजू मांडणार आहेत.

**<><><><>**

अन्न पुरवठा आणि वितरण भ्रष्टाचार प्रकरणी ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आज पश्चिम बंगालमध्ये पश्चिम मेदिनीपूर, दक्षिण २४ परगणा, उत्तर २४ परगणा, नादिया आणि कोलकाता यासह अनेक जिल्ह्यांमध्ये छापे टाकले. विविध गोदामं, रास्त भाव दुकाने आणि रेशन विक्रेत्यांच्या घरांची तपासणी सुरू आहे.

**<><><><>**

गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेले मुंबईकर आता परतीच्या वाटेला लागले आहेत. त्यामुळे माणगाव, इंदापूरसह मुंबई-गोवा महामार्गावरच्या अनेक शहरांमध्ये

वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचं पाहायला मिळत आहे, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पाच दिवसांच्या गौरी-गणपतीचं विसर्जन झाल्यानंतर चाकरमानी कामावर रुजू होण्यासाठी मुंबईला परतत आहेत. त्यामुळे अनेक शहरात पुन्हा एकदा मोठी वाहतूक कोंडी पहायला मिळत आहे.

**<><><><><>**

सणासुदीच्या काळात भेसळयुक्त मिठाई, मसालेदार आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मिती मोठ्या प्रमाणावर होतात. याला आळा घालण्याचे आणि विक्रीवर कडक नजर ठेवण्याचे निर्देश FSSAI, अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी वारंवार अंमलबजावणी आणि पाळत ठेवण्याची मोहीम राबवावी, अशा सुचनाही प्राधिकरणानं दिल्या आहेत. तसंच याला आळा घालण्यासाठी फिरती पथकं तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, ब्रिटनमधल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कणकवलीच्या डॉ. नागवेकर चॅरिटेबल ट्रस्टनं तोंडवली गावात 'गोकुळ' या गोशाळेत शेतकऱ्यांना नकोशा वाटणाऱ्या गायींची

देखभाल करण्याचं काम सुरू केलं आहे. सध्या या गोशाळेत ६० गायींची देखभाल करण्याचं काम वैयक्तिक खर्चातून सुरु आहे.

**<><><><><>**

जैवविज्ञान क्षेत्रातल्या  संशोधन आणि प्रशिक्षणासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठानं नुकतेच दोन संस्थांशी सामंजस्य करार केले. कोल्हापूरच्या सीमा बायोटेक आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या सोलापूर केंद्राशी विद्यापीठानं हे करार केले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना अधिकाधिक संशोधन करण्याची संधी आणि  प्रशिक्षण मिळावं हा यामागचा उद्देश आहे.

**<><><><><>**

अल्जीरियात भारताचे राजदूत म्हणून वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी डॉ स्वाती विजय कुलकर्णी यांची नेमणूक झाली आहे. त्या परराष्ट्र सेवेच्या १९९५ च्या तुकडीतल्या अधिकारी असून सध्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात अतिरिक्त सचिव म्हणून कार्यरत आहेत.

**<><><><><>**

नियंत्रण रेषेवरच्या उर्वरित भागातलं सैन्य पूर्णपणे हटवण्यासाठी तत्काळ आणि दुप्पट जोमानं प्रयत्न करण्यावर भारत आणि चीन यांच्यात सहमती झाली आहे. रशिया मध्ये सेंट पीटर्सबर्ग इथं झालेल्या एका बैठकीत भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्यूरोचे सदस्य आणि केंद्रीय परराष्ट्र व्यवहार आयोगाचे संचालक वांग यी यांच्यात यावर सहमती झाली. दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध चांगले राहावेत यासाठी

सीमाक्षेत्रांमध्ये शांतता प्रस्थापित करणं आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचा सन्मान करणं आवश्यक असल्याचं डोवाल म्हणाले.

<><><><><>

हेरगिरी आणि घातपाताचा ठपका ठेवत रशियाने मॉस्कोमधल्या सहा ब्रिटीश राजनैतिक अधिकाऱ्यांची मान्यता रद्द केली आहे. युक्रेनसोबतच्या संघर्षात मॉस्कोचा पराभव करण्याच्या हेतूने हे अधिकारी काम करत असल्याचा आरोप रशियाच्या फेडरल सिक्युरिटी सर्विस या संस्थेने केला आहे.

//<><><><><>//